अतिप्रदान व अखर्चित ( अर्थसंकल्पीत ) निधीचा परतावा शासनास भरणा ( जमा ) करण्याबाबत.

# जिल्हा परिषद अहिल्यानगर

अर्थ विभाग

जा.क्र.अर्थ/कोषागार/१२८९/२०२६

अहिल्यानगर दिनांक : डिजीटल स्वाक्षरी नुसार

वाचा- महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक - संकीर्ण-२०२६/प्र.क्र.१७/२०२६/कोषा प्रशा ५ मंत्रालय, मुंबई-४०००३२. दिनांक ११ मे, २०२६

## परिपत्रक -

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कोषागारातून आहरित केलेला, प्राप्त झालेला निधी बँक खात्यामध्ये ठेवून खर्च करण्यात येत असतो, सदरचा निधी विहित मुदतीत खर्च न केल्यास शासनास परता करावा लागतो. कोषागारातून आहरित केलेल्या / प्राप्त झालेल्या निधी संबंधात, काही प्रकरणी अतिरिक्त प्रदाने झालेली असतात, काही प्रकरणी निधी चुकीच्या कारणासाठी आहिरत केलेला असतो, अथवा ज्या प्रयोजनासाठी निधी आहरित / प्राप्त झालेला असतो त्या प्रयोजनावर तो खर्च करणे शक्य नसते, अशा सर्व प्रकरणी सदर निधी शासन खाती परत जमा करावा लागतो. असा निधी शासन खाती भरणा करणे करीता उपरोक्त संदर्भीय शासन परिपत्रकान्वये सूचना निगर्मित करण्यात आलेल्या आहेत.

जिल्हा परिषदेच्या मुख्यालयातील विभागांकडून अखर्चित रक्कम व अतिप्रदान रक्कम शासन खाती भरणा करण्यात येत असते. तर पंचायत समितीस्तरावरुन अतिप्रदान रक्कमेचा भरणा करण्यात येत असतो. सदरचा भरणा करत असताना चुकीचे लेखाशिर्ष नमुद करणे, चुकीचा डीडीओ कोड नमुद करणे, विहित नमुन्यात चलन नसणे अशा प्रकारच्या त्रुटी निदर्शनास आल्याने मा.महालेखाकार कार्यालयाकडून आक्षेप नोंदविण्यात आलेले आहे. तसेच चुकीचे लेखाशिर्ष / डिडिओ क्रमांक नमुद केल्याने सदरचा भरणा ज्या प्रयोजनार्थ केलेला आहे त्याच प्रयोजनार्थ लेखांकन करणे इत्यादी अडचणी निर्माण होत आहेत. त्याअनुषंगाने तसेच संदर्भीय शासन परिपत्रकात नमुद केलेनुसार शासनखाती अखर्चित व अतिप्रदान रक्कमेचा भरणा करतांना एकसुत्रता राहावी व सदरचा भरणा करतांना त्रुटी राहू नये या करीता खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. महाराष्ट्र कोषागार नियम नमुना क्रमांक ६ मध्ये चलन तयार करण्यात यावे.

२. चलना मध्ये आहरण व संवितरण अधिकारी डिडिओ क्रमांक हा अचूक नमूद करण्यात यावा. उदा.निधी शिक्षण विभागाकडून प्राप्त झालेला असेल तर शिक्षणाधिकारी यांचा (डिडिओ क्रमांक) नमूद करावा. निधी आरोग्य विभागाकडून प्राप्त झालेला असेल तर जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा (डिडिओ क्रमांक) नमूद करावा. सोबत परिशिष्ट अ मध्ये जिल्हा परिषद अधिनस्त विभाग व त्यांचे डिडिओ क्रमांक यादी जोडण्यात आलेली असून, त्यामध्ये नमूद डिडिओ क्रमांक निधी प्राप्त विभागानुसार अचूक नमुद करण्यात यावा.

३. अखर्चित रक्कमेचा भरणा करावायाचा असल्यास चलनाच्या शिरोभागीच गौण शिर्ष "९१२- अखर्चित रकमांचा भरणा " हा तपशिल नमुद करावा.

४. अतिप्रदान रक्कमेचा भरणा करावायाचा असल्यास चलनाच्या शिरोभागीच गौण शिर्ष "९११- अतिप्रदानाची वसुलीच्या रकमा " हा तपशिल नमुद करावा.

५. चलनाच्या शिरोभागीच गौणशीर्ष तपशिलाखाली लाल शाईने / बोल्ड स्वरुपात अतिप्रदान / अखर्चित रकमा ज्या खर्च लेखाशिर्षामधून आहरीत केल्या त्या खर्च लेखाशिर्षचे पंचस्तरीय वर्गीकरण व CRC कोड अचूकपणे नमूद करावा.

६. चलनामधील मध्य स्तंभात भागात लेखाशिर्ष तपशिल या भागात ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०-इतर सेवा, ८००-इतर जमा, (०१) (१६) संगणक संकेतांक ००७००७६२०१ संकीर्ण हा तपशील कोषागार लेखांकनासाठी नमूद करावा. यामध्ये कोणताही बदल करु नये.

वरील सचूनानुसार चलन तयार करत असतांना चलन कसे तयार करावे याचे नमुनादाखल सोबत चलन देण्यात येत असून सदरच्या चलनानुसार खाली नमुद केले नुसार माहिती भरण्यात यावी.

- A या ठिकाणी कोषागार / उपकोषागार कार्यालयाचा सांकेतांक अचूक नमुद करावा
- B या ठिकाणी आहरण व संवितरण अधिकारी यांचा (डिडिओ) सांकेतांक सोबतच्या परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेनुसार अचूक नमुद करावा.
- C या ठिकाणी गोण शीर्ष ९११- अतिप्रदानाची वसुलीच्या रकमा किंवा ९१२- अखर्चित रकमांचा भरणा यापैकी जे लागू असेल ते नमूद करावे
- D या ठिकाणी जिच्या वतीने रक्कम भरण्यात आली आहे त्या व्यक्तीचे नांव / पदनाम आणि पत्ता नमूद करावा.
- E या ठिकाणी लेख्याचे वर्गीकरण मध्ये फक्त लागू असणार विभाग नमूद करण्यात यावा उर्वरित तपशिल ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०-इतर सेवा, ८००-इतर जमा, (०१) (१६) संगणक संकेतांक ००७००७६२०१ संकीर्ण असा नमूद करावा यामध्ये कोणताही बदल करु नये.
- F या ठिकाणी अतिप्रदान / अखर्चित रकमा ज्या खर्च लेखाशिर्षामधून आहरीत केल्या त्या खर्च लेखाशिर्षाचे पंचस्तरीय वर्गीकरण व CRC कोड अचूकपण नमूद करावा. सदरचा तपशिल मुळ खर्च देयकाच्या प्रथम पृष्ठावर उपलब्ध असतो. / शासनाच्या अनुदान वितरण आदेशामध्ये नमुद असतो / बीम्स प्रणालीवर MIS मधील Budget Books मध्ये उपलब्ध होईल.
- G या ठिकाणी संगणक संकेतांक ००७००७६२०१ हा नमुद करावा. यामध्ये कोणताही बदल करु नये
- H या ठिकाणी रकमा ज्या प्रयोजनार्थ भरणा केलेल्या ते प्रयोजन, प्राधिकार, उद्देश इत्यादी नमुद करुन भरणा रक्कम नमुद करण्यात यावी.

सदरचे परिपत्रक हे कोषागारात अतिप्रदान / अखर्चित रकमांचा भरणा करतांना चुक / त्रुटी राहू नये या करिता मार्गदर्शनपर निर्गमित करण्यात येत असून, प्रचलित नियम / शासन निर्णय / वेळोवेळी निर्गमित आदेश लागू राहतील तसेच कोषागार भरणा हा विहित वेळेत व केलेला भरणा कोषागार कार्यालयाशी पडताळणी करणेची जबाबदारी संबंधित भरणा करणा-या कार्यालयाची राहील.

सदरचे परिपत्रक अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०९०४०५००२९ असा आहे.

Digitally signed by
SHAILESH HINDURAO MORE
Date: 04-09-2026 11:25:09

(शैलेश मोरे)
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

प्रती,

१. खातेप्रमुख ---------------------- (सर्व) जिल्हा परिषद, अहिल्यानगर.
२. गट विकास अधिकारी , पंचायत समिती ---------- (सर्व)जिल्हा अहिल्यानगर.
३. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती ---------- (सर्व) जिल्हा अहिल्यानगर.
४. उप अभियंता, जि.प.बांधकाम/ग्रापापु/लपा उपविभाग, पंचायत समिती ----(सर्व) जिल्हा अहिल्यानगर.
५. बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.से.यो., पंचायत समिती ---------- (सर्व)जिल्हा अहिल्यानगर.
६. तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती ---------- (सर्व) जिल्हा अहिल्यानगर.
७. वैदयकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, ---------- (सर्व) जिल्हा अहिल्यानगर.
८. सहाय्यक लेखाधिकारी, जिल्हा परिषद मुख्यालय व पंचायत समिती ----- (सर्व) जिल्हा अहिल्यानगर

प्रत : मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांना माहितीस्तव सादर.

जिल्हा परिषद अहिल्यानगर, अर्थ विभाग, परिपत्रक क्र.अर्थ/कोषागार/५८९/२०२६ अन्वये

## परिशिष्ट अ

अतिप्रदान व अखर्चित ( अर्थसंकल्पीय ) निधीचा परतावा शासनास भरणा ( जमा ) करण्याबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर अधिनस्त आहरण व संवितरण अधिकारी (डिडिओ) यांचे कोषागार सांकेतांक

| अ.क्र. | विभाग | आहरण व संवितरण अधिकारी पदनाम | कोषागार डिडिओ सांकेतांक |
|---|---|---|---|
| १ | अर्थ विभाग | मुख्य लेखा व वित्त अधिकारी,<br>जिल्हा परिषद, अहिल्यानगर | 5401003267 |
| २ | सामान्य प्रशासन विभाग | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि-१)<br>जिल्हा परिषद, अहिल्यानगर | 5401005113 |
| ३ | जि.प.बांधकाम विभाग उत्तर | कार्यकारी अभियंता<br>जि.प.सा.बां.उत्तर विभाग,<br>जिल्हा परिषद, अहिल्यानगर | 5401015160 |
| ४ | जि.प.बांधकाम विभाग दक्षिण | कार्यकारी अभियंता<br>जि.प.सा.बां.दक्षिण विभाग,<br>जिल्हा परिषद, अहिल्यानगर | 5401001894 |
| ५ | ग्रामिण पाणी पुरवठा विभाग | कार्यकारी अभियंता<br>ग्रामिण पाणी पुरवठा विभाग,<br>जिल्हा परिषद, अहिल्यानगर | 5401005153 |
| ६ | लघु पाटबंधारे विभाग | कार्यकारी अभियंता<br>लघु पाटबंधारे विभाग,<br>जिल्हा परिषद, अहिल्यानगर | 5401005150 |
| ७ | पशुसंवर्धन विभाग | जिल्हा उपायुक्त<br>पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय,<br>जिल्हा अहिल्यानगर | 5401001385 |
| ८ | कृषि विभाग | कृषि विकास अधिकारी<br>जिल्हा परिषद, अहिल्यानगर | 5401001228 |
| ९ | शिक्षण विभाग प्राथमिक | शिक्षणाधिकारी (प्राथमिक)<br>जिल्हा परिषद, अहिल्यानगर | 5401001894 |
| १० | आरोग्य विभाग | जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद, अहिल्यानगर | 5401002530 |
| ११ | महिला व बालकल्याण विभाग | जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि)<br>जिल्हा परिषद, अहिल्यानगर | 5401005737 |
| १२ | समाजकल्याण विभाग | जिल्हा समाजकल्याण अधिकारी<br>जिल्हा परिषद, अहिल्यानगर | 5401005566 |
| १३ | दिव्यांग कल्याण | जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी<br>जिल्हा परिषद, अहिल्यानगर | 5401005656 |

ये. का. मु.-२०,००,०००-१-२०११-पीए५*-(एच) २०५
शा. प., वित्त विभाग क्र. संकीर्ण १००२/
प्र. क्र. १४५/कोषा. प्र. ५, दिनांक १ सप्टेंबर २००४.]

**नमुना म. को. नि. ६**
(नियम ११२ पहा)

सर्वसा. २६ म.
मूळ प्रत/दुसरी प्रत/तिसरी प्रत Gen. २६ m.

A B C D E F G H

कोषागार सांकेतांक | | | | |
उपकोषागार चलन क्रमांक | | | |

आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांक | | | | | | |
विभाग / उपविभाग सांकेतांक | | | | |

या ठिकाणच्या कोषागारात/उपकोषागारात भरण्यात आलेल्या रोख रकमेचे चलन
भारतीय स्टेट बँकेत/ भारतीय रिझर्व्ह बँकेत

## गौण शीर्ष — 912- अखर्चित रकमांचा भरणा

| भरणा करणाऱ्याने भरावयाचे | विभागीय अधिकाऱ्याने किंवा कोषागाराने भरावयाचे | | कोषागाराने/उपकोषागाराने/ भारतीय स्टेट बँकेने/ भारतीय रिझर्व्ह बँकेने/ हैद्रावाद बँकेने भरावयाचे |
|---|---|---|---|
| जिच्या वतीने रक्कम भरण्यात आली आहे त्या व्यक्तीचे नाव/ पदनाम आणि पत्ता<br>-----------------------------<br>-----------------------------,<br>**जिल्हा परिषद, अहिल्यानगर.** | लेख्याचे वर्गीकरण:<br>विभाग :<br>प्रधान शीर्षसेवा : 0070- इतर प्रशासनिक सेवा<br>उप प्रधान शीर्ष : 60- इतर सेवा<br>गौण शीर्ष : 800 — इतर जमा (01) (16)<br>संगणक संकेतांक : 0070076201 संकीर्ण<br><br>2053- जिल्हा प्रशासन<br>093- जिल्हा आस्थापना, (05) स्थानिक क्षेत्रातील योजना<br>(05)(01) जिल्हा परिषदांना अनुदाने.(आस्थापना अनुदान)<br>सुधारित कर्मचारी रचना पध्दती.<br>20530565-36 सहायक अनुदान (वेतन) | | रक्कम मिळाली.<br>रुपये (आकड्यात)<br>रुपये (अक्षरी) ____________<br>____________<br><br>कोषपाल<br>लेखापाल<br>कोषागार/उपकोषागार अधिकारी/बँकेचा व्यवस्थापक<br>चलन क्रमांक \| \| \| \| \|<br><br>नमुना चलन |
| भरणा करण्यासंबंधीच्या प्राधिकार पत्राचा तपशील आणि भरणा करण्याचा उद्देश:<br>• सन 2022-23 मधील लेखाशिर्ष 20530565-36 आस्थापना अनुदान वेतन अखर्चित रक्कम शासन खाती भरणा करणे.<br>धनादेश क्र.00 दि. / /2026 | संगणक सांकेतांक:<br>0 \| 0 \| 7 \| 0 \| 0 \| 7 \| 6 \| 2 \| 0 \| 1 | | |
| भरणा केलेली रक्कम रु. xxxxxxxx/-<br><br>(अक्षरी) रुपये ____________ मात्र | वरील माहिती बरोबर आहे. पैसे स्वीकारावे व पावती द्यावी. | | |
| भरणा करणाऱ्याची स्वाक्षरी<br>दिनांक — / /2026 | दिनांक 12/05/2026 | *स्वाक्षरी<br>पदनाम | दिनांक - |

*(येथे कोषागार/ बँकेत रक्कम भरणा करण्याबाबत आदेश देणाऱ्या अधिकाऱ्याचा रबरी शिक्का ठसवावा.)

[कृपया मागे पहा]

**नमुना म. को. नि. ६**

शा. प., वित्त विभाग क्र. संकीर्ण १००२/
प्र. क्र. १४५/कोषा. प्र. ५, दिनांक १ सप्टेंबर २००४.]

सर्वसा. २६ म.
(नियम ११२ पहा)

मूळ प्रत/दुसरी प्रत/तिसरी प्रत  Gen. २६ m.

कोषागार  सांकेतांक [ | | | ] A
उपकोषागार
चलन क्रमांक [ | | ]

आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांक [ | | | | | ] B
विभाग / उपविभाग सांकेतांक [ | | | ]

या ठिकाणच्या कोषागारात/उपकोषागारात भरण्यात आलेल्या रोख रकमेचे चलन C
भारतीय स्टेट बँकेत/ भारतीय रिझर्व्ह बँकेत

## गौण शीर्ष — 911- अतिप्रदानाची वसुलीच्या रकमा

| भरणा करणाऱ्याने भरावयाचे | विभागीय अधिकाऱ्याने किंवा कोषागाराने भरावयाचे | कोषागाराने/उपकोषागाराने/ भारतीय स्टेट बँकेने/ भारतीय रिझर्व्ह बँकेने/ हैद्राबाद बँकेने भरावयाचे |
|---|---|---|
| जिच्या वतीने रक्कम भरण्यात आली आहे त्या व्यक्तीचे नाव/ पदनाम आणि पत्ता D<br>------------------------------<br>------------------------------,<br>**जिल्हा परिषद, अहिल्यानगर.** | लेख्याचे वर्गीकरण: E<br>विभाग :<br>प्रधान शीर्षसेवा : 0070- इतर प्रशासनिक सेवा<br>उप प्रधान शीर्ष : 60- इतर सेवा<br>गौण शीर्ष : 800 — इतर जमा (01) (16)<br>संगणक संकेतांक : 0070076201 संकीर्ण<br><br>2053- जिल्हा प्रशासन F<br>093- जिल्हा आस्थापना, (05) स्थानिक क्षेत्रातील योजना<br>(05)(01) जिल्हा परिषदांना अनुदाने,(आस्थापना अनुदान)<br>सुधारित कर्मचारी रचना पध्दती.<br>20530565-36 सहाय्यक अनुदान (वेतन) | रक्कम मिळाली.<br>रुपये (आकड्यात)<br>रुपये (अक्षरी) ______<br><br>कोषपाल<br>लेखापाल<br>कोषागार/उपकोषागार अधिकारी/बँकेचा व्यवस्थापक<br>चलन क्रमांक [ | | | ] |
| भरणा करण्यासंबंधीच्या प्राधिकार पत्राच्या तपशील आणि भरणा करण्याचा उद्देश: H<br>• **श्री.अबकड यांचे माहे ---------- च्या वेतनामध्ये अतिप्रदान झालेली रक्कम शासन खाती भरणा करणे**<br>धनादेश क्र.00 दि. / /2026 | संगणक सांकेतांक: G<br>0 \| 0 \| 7 \| 0 \| 0 \| 7 \| 6 \| 2 \| 0 \| 1 | **नमुना चलन** |
| भरणा केलेली रक्कम रु. xxxxxxxx/-<br>(अक्षरी) रुपये ---------------- मात्र | वरील माहिती बरोबर आहे. पैसे स्वीकरावे व पावती द्यावी. | |
| भरणा करणाऱ्याची स्वाक्षरी<br>दिनांक — / /2026 | दिनांक - 12/05/2026 \| *स्वाक्षरी<br>पदनाम | दिनांक - |

*(येथे कोषागार/ बँकेत रक्कम भरणा करण्याबाबत आदेश देणाऱ्या अधिकाऱ्याचा रबरी शिक्का ठसवावा.)

[कृपया मागे पहा]